2. The above is an extract of the detailed format of the Standalone Financial Results for the quarter ended 30 June, 2023 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of standalone results of the Company for the Quarter ended 30 June, 2023 are available on the Stock Exchange website (www.bseindia.com) and on the Companies website www.thinkinkpicturez.com
3. The above results were approved by the Board of Directors at their respecting meeting held on 14th August, 2023.

For and on behalf of the Board of Directors
Sd/-
**Kanhaiya Kumar Jha**
Chief Financial Officer

Place : Mumbai
Dated : 14.08.2023

# CMS INFO SYSTEMS LIMITED

CMS Connecting Commerce

**Regd. Office:** T-151, 5th Floor, Tower No.10, Sector-11, Railway station complex, CBD Belapur, Navi Mumbai - 400 614
**CIN:** L45200MH2008PLC180479, **Website:** www.cms.com
**Email :** investors@cms.com, **Tel.:** +91-22-4889 7400

**NOTICE OF 16th ANNUAL GENERAL MEETING, REMOTE E-VOTING INFORMATION AND RECORD DATE**

1. **NOTICE** is hereby given that the 16th Annual General Meeting (AGM) of the Company will be held on **Wednesday, September 6, 2023 at 03.00 pm IST** through video conference (VC)/other audio visual means (OAVM).
2. In compliance with all the applicable provisions of the Companies Act, 2013 and the Rules made thereunder read with the applicable circulars issued by Ministry of Corporate Affairs ("MCA") and the Securities and Exchange Board of India ("SEBI"), the 16th Annual Report containing the AGM notice for the financial year 2022-23 has been dispatched electronically (by e-mail) to the shareholders on **Monday, August 14, 2023**. The Annual Report containing the AGM notice is also available on the website of the Company at https://www.cms.com, stock exchange websites and the website of National Securities Depository Limited (NSDL) at https://www.evoting.nsdl.com.
3. Members attending the AGM through VC/OAVM will be counted for the purpose of quorum under Section 103 of the Companies Act, 2013 and the facility of appointment of proxy will not be available
4. Members holding shares either in physical form or in dematerialized form, as on the cut-off date i.e. **Wednesday, August 30, 2023** may cast their vote electronically through electronic voting system of NSDL ("remote e-voting"). The voting rights shall be in proportion to the equity shares held by them in the paid-up equity share capital of the Company. Further, the Company has fixed **Wednesday, August 30, 2023**, as the 'Record Date' for determining entitlement of members to final dividend for Financial Year 2022-23, if approved at the AGM
5. Instructions for Remote E-voting and E-voting during the AGM:
   - i. The Ordinary/Special Business as set out in the Notice of AGM shall be transacted through voting by electronic means only i.e by remote e-voting or e-voting at the AGM.
   - ii. The remote e-voting shall commence on **Sunday, September 3, 2023** at IST 9:00 am
   - iii. The remote e-voting shall end on **Tuesday, September 5, 2023 at IST 5:00 pm** and the remote e-voting module will be disabled thereafter by NSDL.
   - iv. The cut-off date for determining the eligibility to vote by electronic means or at the AGM is **Wednesday, August 30, 2023**.
   - v. A person who is a member as on cut-off date only shall be entitled to avail the facility of remote e-voting or e-voting at the AGM. A person who is not a member as on the cut-off date should treat this Notice for information purpose only.
   - vi. Members may note that:
     - a. Once the vote on the resolution is cast by the member, the member shall not be allowed to change it subsequently.
     - b. members who have cast their vote by remote e-voting prior to the AGM may also attend the AGM but shall not be entitled to cast their vote again.
     - c. the e-voting facility shall be made available during the course of AGM for those who have not voted earlier.
     - d. For details relating to e-voting and attending the AGM, please refer the notes mentioned in the AGM notice
   - vii. Members may write an e-mail to NSDL at evoting@nsdl.co.in or to the Company at investors@cms.com in case of questions or grievance related to the facility for e-voting.
6. The Company has appointed M/s. M Siroya & Company, (CoP No. 4157), Practicing Company Secretaries as the scrutinizer to scrutinize the entire e-voting process in a fair and transparent manner.

**FOR CMS INFO SYSTEMS LIMITED**
Sd/-
**Praveen Soni**
Company Secretary and Compliance Officer

Date: August 14, 2023
Place: Mumbai

सेन्सेक्स : ६५,४०१.९२ ▲ ७९.२७ (+०.१२%) | निफ्टी : १९,४३४.५५ ▲ ६.२५ (+०.०३%) | डॉलर/₹ : ८२.९२ ▲ १६ पैसे | तेल / $ ८६.५७ ▼ -०.२८ %

# अदानीप्रकरणी चौकशीसाठी 'सेबी'कडून आणखी कालावधीची मागणी

**पीटीआय, नवी दिल्ली**

अदानी समूहाने आपल्या समभागांची किंमत फुगवल्याच्या हिंडेनबर्ग अहवालातील आरोपांची चौकशी पूर्ण करण्यासाठी अधिक आणखी १५ दिवसांची मुदत द्यावी, अशी मागणी सेबीने सोमवारी सर्वोच्च न्यायालयात नव्याने केलेल्या अर्जात केली आहे. या तपासासाठी न्यायालयाने सेबीला १४ ऑगस्टपर्यंत मुदत दिली होती.

आतापर्यंत आपण २४ प्रकरणांचा तपास आणि चौकशी केली आहे, असे सेबीने आपल्या अर्जात नमूद केले आहे. त्यापैकी १७ चौकशी पूर्ण आणि अंतिम असून त्यांना सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरी मिळाली आहे. एका प्रकरणात आतापर्यंत संकलित करण्यात आलेल्या सामग्रीच्या आधारे चौकशी पूर्ण करण्यात आली असून अंतरिम अहवाल तयार करण्यात आला आहे. सध्याच्या प्रक्रिया आणि रिवाजानुसार सक्षम अधिकाऱ्यांकडून त्याला मंजुरी मिळाली आहे, अशी माहिती सेबीकडून देण्यात आली.

सेबीने न्यायालयाला सांगितल्यानुसार, उरलेल्या सहा प्रकरणांपैकी चार तपासांचे निष्कर्ष काढण्यात आले आहेत आणि त्याचे अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. या प्रकरणाच्या पुढील सुनावणीपूर्वी म्हणजे २९ ऑगस्टपूर्वी हे अहवाल पूर्ण होतील. उरलेल्या दोन प्रकरणांपैकी एका प्रकरणाचा तपास प्रगत टप्प्यावर आहे आणि एका प्रकरणात आतापर्यंत मिळालेल्या माहितीच्या आधारे त्याचा अंतरिम अहवाल तयार करण्यात आला आहे.

या कामासाठी सेबीने परदेशी न्यायालयांच्या कार्यक्षेत्रातील व्यक्ती, संस्था, नियामकांकडून माहिती मागवली आहे. एकंदर प्रगती पाहता तपास पूर्ण होण्यासाठी अधिक वेळ मिळणे न्याय्य आहे, असे सेबीने आपल्या अर्जात नमूद केले आहे.

# निर्यातीला उतरती कळा

## जुलैमध्ये नऊ महिन्यांतील नीचांकी पातळीवर

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**



**देशाच्या निर्यातीत** सरलेल्या जुलै महिन्यात १६ टक्क्यांनी घसरण होऊन, ती ३२.२५ अब्ज डॉलर नोंदवण्यात आली. निर्यातीने मागील नऊ महिन्यांतील नीचांकी पातळी गाठली असून, भारताचे प्रमुख व्यापारी भागीदार देश चीन, अमेरिका यांच्या अर्थव्यवस्थेत घसरण होत असल्याने तेथून घटलेल्या मागणीचा हा थेट परिणाम आहे.

सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, मागील वर्षीच्या तुलनेत चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते जुलै या कालावधीत निर्यातीत १४.५ टक्के घट होऊन ती १३६.२२ अब्ज डॉलर नोंदवण्यात आली. याचवेळी आयातीतदेखील १३.७९ टक्के घट होऊन ती २१३.२ अब्ज डॉलरवर घसरली आहे. सरलेल्या जुलैमध्ये आयात १७ टक्क्यांनी कमी होऊन ५२.९२ अब्ज डॉलरवर आली आहे. पेट्रोलियम, कोळसा, रसायने आणि चांदीच्या आयातीत जुलैमध्ये मोठी घसरण झाली आहे. मागील वर्षी जुलै महिन्यात आयात ६३.७७ अब्ज डॉलर होती.

> जागतिक पातळीवर मंदीचे वारे वाहत आहेत. त्यामुळे बहुतांश देश आयात आणि निर्यातीत घसरण नोंदवत आहेत. आपणही जागतिक पुरवठा साखळीचे भाग असल्यामुळे आपल्याकडे हा परिणाम दिसून येत आहे. इतर देशांपेक्षा आपली निर्यातीतील घसरण कमी आहे.
>
> - सुनील बर्थवाल, केंद्रीय वाणिज्य सचिव

> वस्तू व्यापारातील तूट जुलैमध्ये अपेक्षेप्रमाणे दिसून आली आहे. वस्तूंच्या भावात घसरण झाल्याने निर्यातीसोबत आयात आणि व्यापारी तूटीमध्ये घट झाली आहे. पुढील काही महिने मासिक व्यापारी तूट २० अब्ज डॉलरच्या आसपास राहील, असा अंदाज आहे.
>
> - आदिती नायर, मुख्य अर्थतज्ज्ञ, इक्रा

### व्यापार तूट २०.६७ अब्ज डॉलरवर

व्यापार तुटीतील वाढ कायम असून, ती जुलैमध्ये २०.६७ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे. याचा अर्थ भारतातील एकूण वस्तू निर्यातीच्या तुलनेत वस्तू आयातीचे प्रमाण हे जुलैमध्ये २०.६७ अब्ज डॉलर जास्त होते. जून महिन्यात व्यापार तूट २०.१३ अब्ज डॉलर होती. 'रॉयटर्स'च्या पाहणीत अर्थतज्ज्ञांनी जुलै महिन्यात व्यापारी तूट २१ अब्ज डॉलरवर जाईल, असा अंदाज वर्तविला होता. मागील वर्षी जुलै महिन्यात ती २५.४३ अब्ज डॉलर होती. त्या तुलनेत ती आता १८.७ टक्क्याने कमी होऊन २०.६७ अब्ज डॉलरवर आली आहे.

# रुपयाची ८३ खाली घसरगुंडी

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**



**मुंबई:** विदेशी गुंतवणुकीच्या लक्षणीय प्रमाणात सुरू असलेल्या माघारीने भारतीय चलन अर्थात रुपयाच्या विनिमय मूल्याने सोमवारी अमेरिकी डॉलरसाठी ८३ ची पातळी ओलांडली. सत्रादरम्यान, रिझर्व्ह बँकेकडून रुपयाला सावरण्यासाठी सरकारी बँकांमार्फत केल्या गेलेल्या डॉलरची विक्रीने रुपयाचे मूल्य काहीसे सावरू शकले, तरी ते १६ पैशांच्या घसरणीसह ८२.९५ वर स्थिरावले.

सोमवारच्या आंतरबँक चलन व्यवहारांदरम्यान, रुपयाच्या विनिमय मूल्याने ८३.१२ ही गतवर्षातील ऑक्टोबरनंतरची सर्वात नीचांकी पातळी गाठली होती. गेल्या वर्षी १९ ऑक्टोबरला अमेरिकी डॉलरच्या तुलनेत रुपया ८३.२६ अशा सार्वकालिक नीचांकापर्यंत गडगडला होता. आंतरराष्ट्रीय बाजारात अन्य प्रमुख जागतिक चलनांच्या तुलनेत डॉलरची मजबुती ही रुपयाच्या घसरणीचे कारण विश्लेषकांनी सांगितले. तथापि, रुपयाची मूल्य घसरण आणि खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमतीचाही पिंपामागे ८५ डॉलरपुढे भडका उडणे, हे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने दुहेरी आव्हान ठरणार आहे.

जागतिक अर्थव्यवस्थेबाबत चिंताजनक स्थिती असल्याने जोखमीपासून बचावासाठी डॉलरची मागणी वाढत असल्याचे प्रतिबिंब डॉलर निर्देशांकातील वाढीमध्ये दिसत आहे. त्याउलट भारताच्या औद्योगिक उत्पादन निर्देशांकाची कमकुवत वाढ दाखवणारी कामगिरी आणि किरकोळ चलनवाढ पुन्हा ६ टक्क्यांपुढे कडाडण्याचे (सायंकाळी उशिरा अधिकृतपणे जाहीर होणाऱ्या आकडेवारीनुसार) चिंतादायी कयास यांचा एकत्रित ताण रुपयाच्या घसरणीत दिसून येत असल्याचे मत बीएनपी परिबाचे विश्लेषक अनुज चौधरी यांनी नोंदविले. त्यांच्या मते, या घटकांमुळे विदेशी गुंतवणुकीची माघार येत्या काळात आणखी वाढून, रुपयाच्या मूल्यावर नकारात्मक ताण वाढताना दिसून येईल.

# आयटीसीच्या भागधारकांना प्रत्येक १० समभागामागे विलगीकृत 'आयटीसी हॉटेल्स'चा समभाग

**वृत्तसंस्था, कोलकाता**

**वैविध्यपूर्ण व्यवसाय** स्वारस्य असलेल्या आयटीसी लिमिटेडने सोमवारी झालेल्या संचालक मंडळ बैठकीत हॉटेल व्यवसायाच्या विलगीकरणाला मान्यता दिली असून, स्वतंत्र कंपनी म्हणून 'आयटीसी हॉटेल्स लिमिटेड'च्या समभागांचे पुढील १५ महिन्यांत भांडवली बाजारात सूचिबद्धतेचे नियोजनही जाहीर करण्यात आले.

विलगीकरण योजनेंतर्गत, आयटीसीच्या विद्यमान भागधारकांना त्यांच्याकडील प्रत्येक १० समभागांमागे नवीन 'आयटीसी हॉटेल्स'चा एक समभाग जारी केला जाईल. अशा प्रकारे आयटीसीच्या भागधारकांकडे नवीन कंपनीत सुमारे ६० टक्के भागभांडवल राहणार आहे, तर उर्वरित सुमारे ४० टक्के भागभांडवल हे आयटीसीच्या प्रवर्तकांकडे राहील.

विलगीकरणाची ही योजना भागधारक, कर्जदाते, शेअर बाजार, सेबी, राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरण (एनसीएलटी) आणि इतर नियामकांकडून आवश्यकतेनुसार आवश्यक मंजुरीच्या अधीन असून, हे सोपस्कार पूर्ण करून आयटीसी हॉटेल्सच्या समभागांच्या सूचिबद्धतेसाठी नोव्हेंबर २०२४ पर्यंतची म्हणजे १५ महिन्यांची मुदत संचालक मंडळाने निश्चित केली आहे. आयटीसी हॉटेल्स ही भारतातील बहुतारांकित आलिशान हॉटेलची एक प्रमुख श्रृंखला असून, देशभरात ७० ठिकाणी तिच्या १२० मालमत्ता सध्या कार्यरत आहेत. कंपनीने दिलेल्या माहितीप्रमाणे, आतिथ्य व्यवसायाने एप्रिल-जून २०२३ तिमाहीत सुमारे ६०० कोटींचे उत्पन्न कमावले आहे.

# 'हिरो मोटो'मधून सुनील कांत मुंजाल अखेर बाहेर!

**वृत्तसंस्था, मुंबई**



**हिरो मोटोकॉर्पच्या** सह-व्यवस्थापकीय संचालकपदाचा सुनील कांत मुंजाल यांनी राजीनामा दिला असून, कंपनीच्या व्यवस्थापनातून ते बाहेर पडले आहेत, अशी माहिती कंपनीने सोमवारी भांडवली बाजाराला दिली.

त्यांनी त्यांचे मोठे बंधू पवन मुंजाल आणि प्रवर्तक कुटुंबीयांसाठी 'हिरो'चा त्याग केल्याचे म्हटले जात आहे.

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, हिरो मोटोकॉर्पच्या वरिष्ठ व्यवस्थापनातून सुनील कांत मुंजाल बाहेर पडले आहेत. याचबरोबर त्यांच्याकडे असलेले सह-व्यवस्थापकीय संचालकपदही त्यांनी सोडले आहे. कंपनीला प्रवर्तकांकडून कुटुंबीयांचा तडजोड करार मिळाला असून, त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. 'हिरो' हे व्यापारचिन्ह (ट्रेडमार्क) वापरण्याबाबत कुटुंबीय आणि सुनील कांत मुंजाल यांच्यात अंतिम तडजोड झाली आहे. कुटुंबीयांमध्ये दिवंगत संतोष मुंजाल, रेणू मुंजाल, सुमन कांत मुंजाल आणि पवन मुंजाल यांचा समावेश आहे.

तडजोड करारावर कंपनीचे प्रवर्तक दिवंगत संतोष मुंजाल, रेणू मुंजाल, अध्यक्ष पवन मुंजाल आणि सदस्य सुनीलकांत मुंजाल यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. हा करार २७ जुलै २०१६ रोजी करण्यात आला होता. बीएमएल मुंजाल समूहातील कंपन्यांच्या विभाजनाचा यामागे मूळ हेतू होता. बीएमएल मुंजाल कुटुंबीयांनीच हा करार पूर्णत्वास नेला, असेही कंपनीने स्पष्ट केले आहे.

# 'गोकुळ'ची वाशी येथे नवीन दुग्धशाळा

**मुंबई:** कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या वाशी (नवी मुबंई) येथील विस्तारीकरण व नवीन दुग्धशाळेचे उद्‌घाटन राज्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते, माजी गृह राज्यमंत्री आमदार सतेज पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व संघाचे अध्यक्ष अरुण डोंगळे व संचालक मंडळाच्या उपस्थित अलीकडेच झाले.

उद्‌घाटनप्रसंगी हसन मुश्रीफ म्हणाले, 'उत्कृष्ट चव आणि उत्तम प्रतीच्या दुधामुळे गोकुळ दूध संघाने मुंबईची बाजारपेठ कायम ठेवली आहे. आज अमूलचे आव्हान, परराज्यातील नाममुद्रांचे आक्रमण थोपविण्याची ताकद कोल्हापूरच्या दूध उत्पादकात आहे. मुंबई व परराज्यात मिळून २० लाख लिटर दूध विक्रीचे गोकुळचे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

या विस्तारीकरणामुळे नवी मुंबईत आता दहा लाख लिटर क्षमतेची पॅकेजिंग व्यवस्था सुरू झाली असून, गोकुळच्या खर्चात १२ कोटी रुपयांची बचत होईल.

# 'कोटक-चेरी'वर सर्वंकष वित्तीय सल्लागार सेवांचे दालन लवकरच!

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई:** सध्या गुंतवणूकदारांच्या सुलभतेसाठी पारखून चोखंदळपणे म्युच्युअल फंड, निश्चित-उत्पन्न साधने आणि समभागांचे 'बास्केट्स' अर्थात दर्जेदार गुंतवणूक परडीच्या रूपात प्रस्तुत करणारे 'कोटक चेरी' हे तंत्रज्ञानाधारित व्यासपीठ लवकरच विमा क्षेत्रात गुंतवणुकीचे आणि त्याही पुढे जाऊन सर्वंकष वित्तीय सल्लागार सेवांचे दालन खुले करीत आहे.

म्युच्युअल फंड, समभाग, बॉंड्स, रिट्स, ईटीएफ आणि राष्ट्रीय पेन्शन योजना (एनपीएस) असे गुंतवणुकीचे सर्वांगीण उपाय संकेतस्थळ आणि मोबाइल ॲपद्वारे प्रस्तुत करणारे व्यासपीठ कोटक चेरीने नुकतेच वर्ष पूर्ण केले. जून २०२३ पर्यंत वर्षभरात अखेरपर्यंत पावणेनऊ लाखांच्या घरात ग्राहकांचा विश्वास त्याने कमावला आहे. तंत्रज्ञानाधारित गुंतवणूक सल्ला व्यासपीठांच्या भाऊगर्दीतील आणखी एकाची भर म्हणून न राहता, अनोखेपणावर सुरुवातीपासून भर राखल्याचे सुपरिणामही पहिल्या वर्षात अनुभवता आल्याचे कोटक चेरीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत सुब्रमणियन यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले.

अपेक्षेप्रमाणे कोटक चेरी व्यासपीठावरही २० ते २९ वर्षे वयोगटातील ग्राहकांची बहुसंख्या असून, २० ते ३६ वर्षे वयाच्या ग्राहकांचे प्रमाण ७२ टक्के आहे. व्यासपीठावरील एकूण ग्राहकांमध्ये महिलांचे प्रमाण उच्च दुहेरी अंकात असणे ही समाधानाची बाब असल्याचे सुब्रमणियन यांनी सांगितले. व्यासपीठावर किमानतम १०० रुपयांनाही रोखे खरेदी शक्य होते. प्रति ग्राहक सरासरी म्युच्युअल फंडातील उलाढालीची मात्रा सध्या ३,००० रुपये आहे आणि ग्राहकांकडून नोंदवल्या गेलेल्या सिस्टेमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन अर्थात 'एसआयपी'च्या संख्येने ५० हजारांची पातळी ओलांडली आहे. बाजार नियंत्रक 'सेबी'द्वारे मंजुरीचे सोपस्कार पूर्ण केल्यानंतर, लवकरच गुंतवणूकदारांना त्यांच्या आर्थिक उद्दिष्टांनुरूप, त्यांची जोखीम सोसण्याची क्षमता लक्षात घेऊन सर्वंकष वित्तीय सल्ला देण्याची सुविधाही व्यासपीठावर सुरू केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

आजवर चेरीच्या ग्राहकांना व्यासपीठावर उपलब्ध गुंतवणूक परडी पाहण्याचा आणि पैकी एकाची निवड करून एका क्लिकसरशी खरेदी करण्याचा लाभ मिळत होता. तथापि या स्वतःहून करावयाच्या अर्थात 'डीआयवाय' धाटणीच्या पद्धतीला आता तज्ज्ञ सल्ल्याची जोड देत गुंतवणूकदारांना अधिक सक्षम निर्णयाच्या दिशेने वळण घेण्यासाठी मदत करण्याच्या पर्यायाची चाचपणी सुरू असल्याचे सुब्रमणियन यांनी सांगितले.



> गुंतवणूकदारांच्या पैशाच्या व्यवस्थापनाच्या व्यवसायात तंत्रज्ञानाची भूमिका आणि त्यातून साधली जाणारी सुलभता महत्त्वाची असली तरी, प्रत्यक्ष गुंतवणुकीतील अनुभव आणि तज्ज्ञतादेखील तितकीच महत्त्वाची भूमिका बजावते. वित्तीय क्षेत्रात विविधांगी संचार असलेल्या कोटक समूहाचे पाठबळ हे 'कोटक चेरी'ला इतरांपासून वेगळे करणारे वैशिष्ट्यपूर्ण अनोखेपण निश्चितच आहे.
>
> - श्रीकांत सुब्रमणियन, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोटक चेरी

NORTON **ग्राइंडवेल नॉर्टन लि.**

नोंदणीकृत कार्यालय: लीला बिझनेस पार्क, लेव्हल ५, अंधेरी-कुर्ला रोड, मरोळ, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९.
टेलिफोन: ०२२-४०२१२१२१, फॅक्स: ०२२-४०२१२१०२, इमेल: sharecmpt.gno@saint-gobain.com,
वेबसाइट: www.grindwellnorton.co.in, सी आय एन - L26593MH1950PLC008163

SAINT-GOBAIN

**३० जून, २०२३ रोजी समाप्त तिमाहीसाठी**
**एकत्रित अलेखापरिक्षित आर्थिक निष्कर्षांचा गोषवारा**

(रु. लाखांत)

| अनु. क्र. | तपशील | ३०-०६-२०२३ रोजी समाप्त तिमाहीसाठी (अलेखापरिक्षित) | ३०-०६-२०२२ रोजी समाप्त तिमाहीसाठी (अलेखापरिक्षित) | ३१-०३-२०२३ रोजी समाप्त वर्षासाठी (लेखापरिक्षित) |
|---|---|---|---|---|
| १ | एकूण उत्पन्न | ६८,२१५ | ६४,८८८ | २,५९,७४१ |
| २ | करोत्तर निव्वळ नफा / (तोटा) | ९,६८८ | ९,२७४ | ३६,१५२ |
| ३ | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीसाठी नफा / (तोटा) (करोत्तर) आणि अन्य व्यापक उत्पन्न (करोत्तर) यांचा समावेश करून] | ९,६५३ | ९,२१२ | ३६,८३४ |
| ४ | भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. ५/- प्रत्येकी) | ५,५३६ | ५,५३६ | ५,५३६ |
| ५ | मूळ व विरल प्रति शेअर प्राप्ती (असाधारण बाबींच्या आधी) (प्रत्येकी रु. ५/- च्या) (वार्षिकीकरण न करता) | ८.७६ | ८.३५ | ३२.६९ |
| ६ | मूळ व विरल प्रति शेअर प्राप्ती (असाधारण बाबींच्या नंतर) (प्रत्येकी रु. ५/- च्या) (वार्षिकीकरण न करता) | ८.७६ | ८.३५ | ३२.६९ |

**३० जून, २०२२ रोजी समाप्त तिमाहीसाठीचे कंपनीच्या अलेखापरिक्षित स्वतंत्र आर्थिक निष्कर्षांचे आकडे खालीलप्रमाणे आहेत:**

(रु. लाखांत)

| अनु. क्र. | तपशील | ३०-०६-२०२३ रोजी समाप्त तिमाहीसाठी (अलेखापरिक्षित) | ३०-०६-२०२२ रोजी समाप्त तिमाहीसाठी (अलेखापरिक्षित) | ३१-०३-२०२३ रोजी समाप्त वर्षासाठी (लेखापरिक्षित) |
|---|---|---|---|---|
| १ | एकूण उत्पन्न | ६७,४६९ | ६४,५१६ | २,५७,९७७ |
| २ | करपूर्व नफा | १३,००६ | १२,४९१ | ४९,०८७ |
| ३ | कालावधीसाठी निव्वळ नफा | ९,७१० | ९,२८७ | ३६,५९३ |

टीपा:
१. वरील माहिती, सेबी (सूची दायित्वे आणि इतर प्रकटीकरण आवश्यकता, सुधारित केल्याप्रमाणे) नियम, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसना दाखल केलेल्या कंपनीच्या, ३० जून २०२३ रोजी समाप्त तिमाहीसाठीच्या तपशीलवार तिमाही आर्थिक निष्कर्षांचा गोषवारा आहे. कंपनीचे एकत्रित आर्थिक निष्कर्ष तिमाही ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड ("मूल कंपनी", "कंपनी")च्या वैयक्तिक लेखापरीक्षकाद्वारे मर्यादित पुनरावलोकनाच्या अधीन आहेत. आर्थिक निष्कर्षांची पूर्ण स्वरूपातील माहिती स्टॉक एक्स्चेंजेसच्या www.bseinidia.com आणि www.nseindia.com या वेबसाइटस्वर तसेच कंपनीच्या www.grindwellnorton.co.in या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.
२. उपरोक्त आर्थिक निष्कर्ष, कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या समितीने तपासले आहेत आणि संचालक मंडळाने दि. १४ ऑगस्ट, २०२३ रोजी भरविण्यात आलेल्या त्यांच्या बैठकीत त्यांना मंजूरी दिली आहे.
३. ३० जून २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीत, कंपनीने रु. १२,११२ लाखांच्या मोबदल्यात पी आर एस पर्मसिल प्रायव्हेट लिमिटेड (PRS)चे १००% इक्विटी शेअर्स विकत घेतले होते. त्यानंतर, नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल (NCLT)ने रीतसर मंजूर केलेल्या कंपनीसोबत PRS च्या विलीनीकरणाच्या योजनेनुसार, PRS ची सर्व मालमत्ता २७ मे २०२२ ह्या नियुक्त तारखेपासून वाजवी मूल्यावर कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आली आणि निहित केली गेली. मालमत्तेच्या आणि दायित्वांच्या वाजवी मूल्यापेक्षा जास्त दिल्या गेलेला रु. ४,६३० लाखांचा मोबदला सद्भावना (गुडविल) म्हणून गणला गेले आहे. कंपनी NCLT च्या आदेशानुसार विहित केलेल्या नियामक आवश्यकता पूर्ण करण्याच्या प्रक्रियेत आहे. त्यानुसार, चालू तिमाहीचे तसेच संबंधित मागील कालावधींचे PRS चे निष्कर्ष एकत्रीकरणाचा भाग म्हणून नव्हे तर विलीन झालेल्या घटकाचा भाग म्हणून विचारात घेतले गेले आहेत.
४. आधीच्या कालावधीसाठीचे आकडे, वर्तमान कालावधीच्या वर्गीकरणाशी सुसंगत करून घेण्यासाठी, महत्वाचे असतील तिथे, आवश्यकतेनुसार पुनर्गठित/पुनर्वर्गीकृत करण्यात आले आहेत.

ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड साठी
बी. संथानम
व्यवस्थापकीय संचालक
संचालक ओळख क्र. ००५१४८०६

मुंबई
१४ ऑगस्ट, २०२३

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**TENDER NOTICE**

Tenders are invited for procurement of HT XLPE cables under RDSS Cyclone Resilient Network for NCRMP works of Ratnagiri & Sindhudurg District with Estimated Cost of Rs. 292.73 Crs. against MSEDCL advertised Tender on website vide no. MMD/T-LTM-13/0823 due for submission on dtd. 05/09/2023.
For details please visit website: https://etender.mahadiscom.in/eatApp/

HO PR 325/2023 Chief Engineer [MMD]

CMS Connecting Commerce

**सीएमएस इन्फो सिस्टिम्स लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय:** टी-१५१, ५वा मजला, टॉवर क्र. १०, सेक्टर-११, रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
**दूरध्वनी:** +९१-२२-४८८९ ७४००, **संकेतस्थळ:** www.cms.com,
**ईमेल:** investors@cms.com,
**सीआयएन:** एल४५२००एमएच२००८पीएलसी१८०४७९,

**१६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, रिमोट ई-व्होटींगची माहिती आणि अभिलेखन**

१. याद्वारे **सूचना** देण्यात येते की, कंपनीची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) **बुधवार, ६ सप्टेंबर, २०२३ रोजी भाप्रवे दु. ०३.०० वाजता** व्हीडीयो कॉन्फरन्स (व्हीसी)/ अन्य ऑडीयो व्हीज्यूअल साधनांद्वारे (ओएव्हीएम) संपन्न होईल.
२. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (''एमसीएस'') आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाद्वारे (''सेबी'') वितरीत परिपत्रकांसह वाचित कंपनी कायदा, २०१३ आणि त्या अंतर्गत नियमांच्या सर्व प्रयोज्य तरतुदींच्या अनुपालनामध्ये, वित्तीय वर्ष २०२२-२३ करता एजीएम सूचना अंतर्भुत १६वा वार्षिक अहवाल शेअरधारकांना **सोमवार, १४ ऑगस्ट, २०२३** रोजी इलेक्ट्रॉनिक पध्दतीने (ई-मेलद्वारे) पाठविण्यात आला. एजीएम सूचना अंतर्भुत वार्षिक अहवाल कंपनीच्या संकेतस्थळ https://www.cms.com आणि नॅशनल सिक्युरिटीज डीपॉजीटरी लिमिटेडच्या (एनएसडीएल) संकेतस्थळ https://www.evoting.nsdl.com वरही उपलब्ध आहे.
३. कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत व्हीसी/ओएव्हीमद्वारे एजीएमला उपस्थित राहणाऱ्या सभासदांची गणपूर्तिसाठी मोजणी करण्यात येईल आणि प्रॉक्सी नियुक्त करण्याची सुविधा उपलब्ध नसेल.
४. कट-ऑफ दिनांक अर्थात **बुधवार, ३० ऑगस्ट, २०२३ रोजी** भौतिक अथवा डीमॅट प्रारूपामध्ये शेअर्स धारण करणारे सभासद एनएसडीएलच्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे त्यांचे मतदान करू शकतील. मतदानाचा कंपनीच्या संपूर्ण भरणा झालेल्या समभाग भांडवलामधील त्यांच्याद्वारे धारण केलेल्या समभागांच्या समप्रमाणामध्ये असेल. तसेच, कंपनीने एजीएममध्ये लाभांश मंजूर झाल्यास, वित्तीय वर्ष २०२२-२३ च्या अंतिम लाभाशांसाठी सभासदांचा हक्क निर्धारित करण्यासाठी ''अभिलेखन दिनांक'' म्हणून **बुधवार, ३० ऑगस्ट, २०२३** ही तारीख निश्चित केली आहे.
५. रिमोट ई-व्होटींग आणि एजीएम दरम्यान ई-व्होटींगचे अनुदेश :
i. एजीएम सूचनेमध्ये नमूद सर्वसाधारण/विशेष कामकाज केवळ इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे अर्थात रिमोट ई-व्होटींग किंवा एजीएम दरम्यान ई-व्होटींगद्वारे निष्पादित करण्यात येईल.
ii. रिमोट ई-व्होटींग **रविवार, ३ सप्टेंबर, २०२३ रोजी भाप्रवे स. ९:०० वाजता** सुरू होईल.
iii. रिमोट ई-व्होटींग **मंगळवार, ५ सप्टेंबर, २०२३ रोजी भाप्रवे सायं. ५:०० वाजता** समाप्त होईल आणि त्यानंतर एनएसडीएलद्वारे रिमोट ई-व्होटींग मॉड्यूल निष्क्रिय करण्यात येईल.
iv. इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे एजीएममध्ये मतदानासाठी पात्रता निर्धारित करणारी कट-ऑफ तारीख **बुधवार, ३० ऑगस्ट, २०२३** आहे.
v. जी व्यक्ती कट-ऑफ तारखेला सभासद आहे केवळ तीच रिमोट ई-व्होटींग किंवा एजीएममध्ये ई-व्होटींग सुविधा प्राप्त करण्यासाठी हक्कदार असेल. कोणतीही व्यक्ती कट-ऑफ तारखेला सभासद नाही तीने ही सूचना केवळ माहितीच्या कारणासाठी समजावी.
vi. सभासदांनी नोंद घ्यावी की :
अ. सभासदाकडून ठरावावर एकदा मतदान करण्यात आल्यावर, सभासदाला ते नंतर बदलण्याची परवानगी नसेल.
ब. ज्या सभासदाने त्याचे मतदान एजीएमपूर्वी रिमोट ई-व्होटींगद्वारे केले आहे तो एजीएमला उपस्थित राहू शकतो परंतू तो पुन्हा त्याचे मतदान करण्यासाठी पात्र नसेल.
क. एजीएम कामकाजाच्या दरम्यान, ज्यांनी अगोदर मतदान केले नसेल त्यांना ई-व्होटींग सुविधा उपलब्ध करण्यात येईल.
ड. ई-व्होटींग आणि एजीएमला उपस्थित राहण्याच्या संबंधीत तपशिलासाठी, कृपया एजीएम सूचनेमध्ये नमूद सूचना पहा.
vii. ई-व्होटींगकरिताच्या सुविधा संबंधीत विचारणा किंवा तक्रारी असल्यास, सभासद एनएसडीएलला evoting@nsdl.co.in येथे किंवा कंपनीच्या investors@cms.com येथे ई-मेल करू शकतील.
६. कंपनीने मेसर्स सिरोया अॅण्ड कंपनी, (सीओपी क्र. ४१५७), प्रॅक्टीसींग कंपनी सेक्रेटरी यांची संपूर्ण ई-व्होटींग प्रक्रियेच्या निष्पक्ष आणि पारदर्शक पध्दतीने छाननीसाठी निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

सीएमएस इन्फो सिस्टिम्स लिमिटेड करिता
हस्ता/-
प्रवीण सोनी
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

दिनांक: १४ ऑगस्ट, २०२३
स्थळ: मुंबई